

स्थित्यंतर – सेंद्रिय शेतकडे

Rohan Yogesh Raut

शेतकऱ्यांच्या शेतातील रासायनिक घटकांची जागा आता जैवघटकांनी घेतली आहे.

शेती करण्याच्या पद्धती बदलत आहेत. रासायनिक पासून पारंपारिक पण तरीही नवीन धाटणी, नवीन दृष्टिकोन तसेच नवीन आव्हाने. सेंद्रिय शेती असो, पुनुरुत्पादक किंवा झिरो बजेट असो, शेतकऱ्यासाठी आर्थिक व पर्यावरणीय शाश्वती महत्त्वाची

सेंद्रीय शेतीचा ११ वर्षांचा अनुभव आणि महाराष्ट्राच्या चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर तालुक्यात असलेल्या गोंदेडा गावात लहान सेंद्रीय धान उत्पादकांबरोबर पाच वर्षे काम केल्यानंतर, मागील खरीप हंगामात आम्ही (जनरस टेक्नॉलॉजीज प्रा.लि.) महाराष्ट्रातील भंडारा जिल्ह्यातील आसेगाव या अत्युच्च कीटकसंकट असलेल्या धानउत्पादक परिसरातील गावात प्रयत्न करावयाचे ठरविले. कृषी क्षेत्रातील वापरात असलेली पद्धत बदलणे हे काही सोपे काम नाही. त्या आठ शेतकऱ्यांसाठी देखील ते सोपे नव्हते. चर्चेच्या अनेक फेऱ्यांनंतर आणि यशस्वी धान उत्पादकांच्या शेतांना वारंवार भेटी दिल्यानंतर, या शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतातील किमान एक एकर जागेचा उपयोग सेंद्रीय पद्धतींचा वापर करण्यासाठी तयारी दर्शविली. अत्यंत चांगल्या आणि मध्यम आकाराच्या 'जय श्रीराम' या तांदळाच्या वाणाचा उपयोग करण्याबाबत सर्व शेतकऱ्यांचे एकमतही झाले.

दर एकरी दोन टन कम्पोस्ट वापरण्यात आले. शेतातील खते आणि टाकाऊ बाबी वापरून व त्यांच्यावर प्रक्रिया करून हे कम्पोस्ट तयार करण्यात आले. कचरा कुजविण्याची संपूर्ण प्रक्रिया पार पडल्यानंतर, आठ प्रकारचे जीवाणू आणि बुरशी त्यामध्ये मिसळण्यात आले. बियाण्यांवर प्रक्रिया करण्यासाठी विविध जैविक खते वापरण्यात आली, धैंचा/बोरू हे हरित खत म्हणून वापरले गेले. दशपर्णी अर्क (दहा पानांचा अर्क) लिंबाच्या पानांचा अर्क, अग्नी अस्त्र (मिरची, आले, लसूण यांचा अर्क) यांचा वापर कीटकनाशक म्हणून करण्यात आला आणि गाजरगवत अर्क, जीवामृत, वर्मीवॉश आणि पंचगव्य हे धानाच्या रोपांच्या वाढीला पोषक म्हणून वापरले.

लहान शेतजमिनीत मोठ्या प्रमाणात खते, कीटकनाशके, मजुरी आणि पैसा यांचा जेथे मोठ्या प्रमाणात वापर करावा लागतो अशा शेतीक्षेत्रात काम करण्याचा आमचा पहिलाच अनुभव होता. अगदी विषम हवामान असतानाही रासायनिक खते वापरणाऱ्या शेजारील शेतांच्या तुलनेत पिकांनी खूपच समाधानकारक प्रतिसाद दिला आणि हे आमच्यासाठी देखील आश्चर्य होते. कीटकांच्या संसर्गात झालेली घट आणि रोगप्रतिकाराची वाढलेली क्षमता याबाबत शेतकऱ्यांना अत्यंत चांगले अनुभव आले आणि परिणामी धानाची उत्पादकताही वाढली.

सर्व आठही शेतकऱ्यांना चांगले म्हणजे प्रति एकर ९ ते ११ क्विंटल धान उत्पादन त्यांच्या पहिल्याच सेंद्रीय पेरणीतून मिळाले. त्याचवेळी, रासायनिक पद्धतीने केलेल्या शेतीतील धान उत्पादन हे २ ते ४ क्विंटल होते. येथे हे नमूद करण्यासारखे आहे की रासायनिक शेतांमध्ये, विषम हवामानामुळे यंदाचे उत्पन्न अत्यंत कमी होते. या परिसरात चांगल्या दर्जाच्या वाणाला रासायनिक पद्धतीने साधारणत: प्रति एकर १५ ते १६ क्विंटल उत्पादन मिळते.

रासायनिक पिकांच्या तुलनेत चांगले उत्पन्न मिळाल्याने शेतकरी आनंदित तर होतेच, मात्र त्याशिवाय त्यांना त्यांच्या उत्पादनांची चांगली किंमतही मिळाली. उत्पादन खर्च ५० टक्क्यांनी कमी झाला आणि काही ठिकाणी त्यापेक्षाही कमी खर्च आला, शेतकऱ्यांची आधीच्या वर्षापेक्षा जास्त बचत

झाली आणि जास्त कमाई देखील झाली. कृषि उद्योजक म्हणून आम्ही सेंद्रिय शेतीला कसे प्रोत्साहन देत आहोत हे एक छोटेसे उदाहरण आहे.

धोरणात्मक आधार

जिल्हा/तालुका स्तरावर कृषी विभाग आणि अग्रिकल्चर टेक्नॉलॉजी मॅनेजमेंट एजन्सी (आत्मा) हे सहभागिता आश्वासन योजनेच्या (पीजीएस) माध्यमातून सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन देत आहेत. सेंद्रीय शेतीला लागणारे निविष्ठा तयार करण्याचे प्रशिक्षण शेतकऱ्यांना देण्यात येते आहे. याकरिता आवश्यक असणाऱ्या विविध बाबी, जसे की २०० लिटर ड्रम, गांडूळखत इत्यादी या सवलतीच्या दरात पुरविण्याचीही तरतूद आत्मामध्ये आहे. स्वच्छ उत्पादन, ट्रिचो कार्ड निर्मिती याकरिता शेतकरी गट आणि महिला स्वयंसहायता गट यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. या प्रयत्नांमुळे अनेक एफपीओ हे नोंदणीकृत सेंद्रीय उत्पादक गट म्हणून काम करीत आहेत. नागपूर जिल्ह्यात, कृषी विभाग महापालिकेच्या साहाय्याने शेतकऱ्यांच्या उत्पादनांचे मार्केटिंग आणि विक्री ही दुबळी बाजू मजबूत व्हावी याकरिता प्रयत्न करीत आहे आणि त्याकरिता महत्त्वाच्या जागाही शोधते आहे.

मी सेंद्रिय शेतकऱ्यांना नेहमी सांगतो, ''तुमच्या बाजूच्या शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीकडे वळवण्याचा प्रयत्न करा. तुम्ही अनुभवलेले फायदे त्यांना सांगा. जर त्यांनी तुचे ऐकले तर अप्रत्यक्षपणे त्याचा तुम्हाला फायदा होईल. तुम्ही आनंदी व्हाल. त्यांनी ऐकले नाही तरी तुम्ही सुखी असाल. कारण त्याच्या रासायनिक वापरामुळे कीटक आणि पिकावरील रोग प्रथम त्याच्या पिकाकडे आकर्षित होतील – लेखक

आव्हाने

सेंद्रीय शेती हा सुनियोजित उपक्रम म्हणून स्वीकारला पाहिजे. सेंद्रीय शेती हा शेतीमधील एक प्रतिबंधात्मक उपाय आहे. सेंद्रीय शेती सुरू करण्यासाठी सर्वात आधी पिकांच्या उत्पादनापासून ते मालाच्या विपणनापर्यंतची संपूर्ण प्रक्रिया समजून घेणे गरजेचे आहे. नेमके याच बाबतीत काही ठिकाणी चुका झाल्या आहेत.

सेंद्रीय शेतीचा स्वीकार करण्यात शासकीय व्यवस्थेचा सहभाग मोठा आहे. मात्र सेंद्रीय शेतीकडे वळण्यात शेतकऱ्यांच्या मंद गतीची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१. रासायनिक शेतीने शेतकऱ्यांना 'रेडिमेड आणि फास्ट' यांची सवय लावली आहे. सेंद्रीय शेतीत शेतकऱ्यांना त्यांची खते, कीटकनाशके आणि बुरशीनाशक हे स्वत: तयार करावे व्या लागतात/त्यांच्यावर प्रक्रिया कराव्या लागतात आणि यासाठी त्यांची तयारी नसते.



जैवघटकांचा वापर करून शेतकऱ्यांनी अधिक चांगले उत्पादन घेतले आहे

२. सेंद्रीय शेती ही प्रतिबंधात्मक पद्धत असल्याने, त्याकडे वळण्याच्या प्राथमिक टप्प्यात, फवारणीच्या वेळापत्रकात सक्रियता दाखविणे गरजेचे असते. त्यामुळे, फवारणींची संख्या (काही प्रकरणांमध्ये) वाढू शकते. हे बरेचदा शेतकऱ्यांकडून केले जात नाही. एकदा संसर्ग नियंत्रणाबाहेर गेला की, सेंद्रीय शेतीची विश्वासार्हता धोक्यात येते.

३. रासायनिक पद्धतीपेक्षा सेंद्रिय पद्धतीमध्ये मजुरांची गरज ही काही प्रमाणात जास्त असते. जिथे मजुरांची टंचाई आणि प्रति एकर खर्च जास्त आहे तेथे हा मुद्दा महत्त्वाचा आहे.

४. सेंद्रिय शेतीला पशुसंवर्धनाची जोड दिल्यास ती अधिक लाभदायक ठरते. आपण नेहमीच हे लक्षात ठेवले पाहिजे की, ''एका उद्योगातील टाकाऊ बाबी या दोन उद्योगात उपयोगी ठरतात.'' सगळे शेतकरी गुरे पाळू शकत नाहीत. अनेक घटक तयार करण्यासाठी मूत्र आणि शेण यासारख्या प्राण्यांच्या टाकाऊ बाबींची गरज भासते, त्या बाहेरून घेतल्याने खर्चात वाढ होते.

पुढील मार्गक्रमण

पिकांची निवड करण्याआधी उत्पादन कुठे विकले जाणार यासाठीची बाजारपेठही शोधून ठेवली पाहिजे. जर एखाद्या शेतकऱ्याला त्याचा माल कृषी उत्पन्न बाजार समितीत विकावयाचा असेल तर त्याने सेंद्रीय शेतीत आपले मौल्यवान प्रयत्न वाया घालवू नये, असाच सल्ला द्यावा लागेल, आधी बाजारपेठ निश्चित करण्यानेच अर्धी लढाई जिंकली जाऊ शकते.

सेंद्रीय पद्धतीने उत्पादन घेण्यामागील विज्ञान शेतकऱ्यांनी पेरणीच्या आधीच समजून घेतले पाहिजे. मृदा, पिके आणि उपलब्ध संसाधनांचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे. काही शेतकऱ्यांच्या पॅकेज ऑफ प्रॅक्टिस (पीओपी) ची नक्कल करण्याचे प्रमाण प्रचंड मोठे आहे. शेतकऱ्यांनी त्यांचे वातावरण आणि संसाधने यांचा उपयोग करुन प्रक्रियेमध्ये आवश्यक बदल घडविले पाहिजे. या सगळ्या बाबींचा अभ्यास करून शेतकऱ्यांनी लहान भूभागावर सेंद्रीय शेतीला सुरुवात केली पाहिजे.

ज्ञान आणि संसाधने यांच्या देवाणघेवाणीसाठी समुहाची स्थापना करणे नेहमीच लाभदायक असते. त्यामुळे, खरेदी आणि विक्री यासाठी देखील बळ मिळते.

यातून मिळणाऱ्या मृदा संवर्धन, मृदाजल संवर्धन, मानवी आरोग्यावरील परिणाम अशा अप्रत्यक्ष घटकांकडे जरी दुर्लक्ष केले तरी उच्च बाजारमूल्यामुळे मिळणारे थेट आर्थिक लाभ देखील बरेच मोठे आहेत, सगळ्यात आधी सेंद्रीय शेतीच्या अर्थकारणाची शेतकऱ्याला खात्री असली पाहिजे. त्याच्याकरिता अप्रत्यक्ष लाभ हे बोनससारखे असते.गतिमान आणि रेडिमेड दृष्टिकोन याकडे दुर्लक्ष करण्याची आणि आर्थिक व पर्यावरणीय शाश्वतता यांच्या बदलत्या गरजांना प्रतिसाद देण्याची वेळ आली आहे.

Rohan Yogesh Raut
Address - 63, Mire Layout, Near Sudampuri,
Sakkardara Square, Nagpur-440009
Email : raut.rohan1@gmail.com

मराठी अनुवाद : कल्याणी मोरोणे

Source : Transitioning towards organic farming
Leisa India - March, 2021